**महाराष्ट्र शासन**

क्र. उमवि २००४/(२७०/०४)/मशि-३,
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २१ जुलै, २००४.

प्रति,
कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

विषय : **महात्मा फुले सामाजिक आणि शैक्षणिक मंडळ, जळगांव. अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत..**

संदर्भ : राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ यांचे दि. १५.७.२००४ चे पत्र.

महोदय,

महात्मा फुले सामाजिक आणि शैक्षणिक मंडळ, चाळीसगांव, जि. जळगांव या संस्थेस चाळीसगांव, जि. जळगांव या ठिकाणी बी. एड. (अध्यापक) महाविद्यालय सुरु करण्यास शासनाच्या दिनांक २.७.२००३ च्या पत्रान्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते.

२. आता राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ यांनी त्यांच्या दिनांक १५.७.२००४ च्या पत्रान्वये महात्मा फुले सामाजिक आणि शैक्षणिक मंडळ, चाळीसगांव, जि. जळगांव या संस्थेस चाळीसगांव, जि. जळगांव या ठिकाणी अध्यापक महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून सुरु करण्यास काही अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे. सदर मान्यता लक्षात घेऊन उपरोक्त संस्थेत खालील अटी व शर्तीवर सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

१) एन. सी. टी. ई., भोपाळ यांनी दिनांक १५.७.२००४ च्या पत्रात दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ, शासन व विद्यापीठ यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३. सदर महाविद्यालयाने वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यास त्या अधिन महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व आपला अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपली,

(अं. अ. कारखानीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत -**

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव.
३) अध्यक्ष/सचिव, महात्मा फुले सामाजिक आणि शैक्षणिक मंडळ, चाळीसगांव, जि. जळगांव.
४) निवडनस्ती/मशि-३.